अमर चित्र कथा

भगवान बुध्द

VOL 510 | ₹ 99



शोध आपल्या संस्कृतीचा

आपल्या जडणघडणीच्या काळाकडे जेव्हा अनेक भारतीय मागे वळून पाहतात, तेव्हा ते त्यांच्या मनावर '**अमर चित्र कथा**'यांच्या चित्ररूपी पुस्तकांनी केलेले संस्कार महत्वाचे मानतात. याच अमर चित्र कथांच्या माध्यमातून त्यांना आपल्या गौरवशाली परंपरेची पहिली ओळख झाली.

१९६७ सालापासून आजपर्यंत अमर चित्र कथांची ४५० पेक्षा अधिक पुस्तके प्रसिध्द झाली असून, आजपर्यंत नऊ कोटींपेक्षा जास्त प्रतींची विक्री संपूर्ण जगभरात झाली आहे.

आज संपूर्ण भारतात १००० पेक्षा अधिक ग्रंथदालनांमध्ये अमर चित्र कथा उपलब्ध आहेत. आपल्या जवळच्या ग्रंथदालनाचा पत्ता जाणून घेण्यासाठी **www.ack-media.com** या संकेतस्थळावर संपर्क करावा. जर ग्रंथदालनात प्रती उपलब्ध नसतील तर, आपण आमचे ऑनलाइन ग्रंथदालन **www.amarchitrakatha.com** येथून सुध्दा पुस्तके मिळवू शकता. तेथून पुस्तकांचे वितरण जगभरात कोठेही त्वरीत केले जाते.

आमच्या या पुस्तकांच्या खजिन्यातून आपले आवडीचे पुस्तक निवडण्यासाठी आम्ही आपल्या सोयीकरीता पुस्तकांची सहा गटात विभागणी केली आहे.

महाकाव्य व पौराणिक
महाकाव्ये आणि पुराणांतील प्रसिध्द कथा

अभिजात भारतीय साहित्य
भारतीय साहित्यातील मनोहारी कथा

बोध आणि विनोद
लोककथा, दंतकथा, बोधकथा आणि विनोदी कथा

वीरगाथा
शौर्यवान भारतीय स्त्री-पुरूषांच्या कथा

युगनिर्माता
भारतीय विचारवंत, समाज सुधारक आणि राष्ट्रनिर्मात्यांच्या कथा

समकालीन अभिजात साहित्य
आधुनिक भारतीय साहित्यातील सर्वोत्कृष्ट कथा

कथा : एस्.के.रामचंद्र **चित्र** : सॉरेन रॉय **संपादक** : अनंत पै **मुखपृष्ठ** : पी.डी.चोप्रा

Amar Chitra Katha Pvt Ltd
© Amar Chitra Katha Pvt Ltd, 1971, Reprinted November 2025,
ISBN 978-93-5085-161-6
Published by Amar Chitra Katha Pvt. Ltd., Mumbai - 400059, India.
For Consumer Complaints Contact Tel : + 91-2249188881/2
Email: customerservice@ack-media.com
Printed in India

This book is sold subject to the condition that the publication may not be reproduced,
stored in a retrieval system (including but not limited to computers, disks, external drives, electronic or digital devices, e-readers, websites),
or transmitted in any form or by any means (including but not limited to cyclostyling, photocopying, docutech or other reprographic reproductions,
mechanical, recording, electronic, digital versions) without the prior written permission of the publisher, nor be otherwise circulated in any form of
binding or cover other than that in which it is published and without a similar condition being imposed on the subsequent purchaser.

बुद्ध



हिमालयाच्या पायथ्याशी कपिलवस्तू नावाचे लहानसे पण वैभवशाली राज्य होते. त्यावर शाक्यांचे राज्य होते. त्यांच्या राजाचे नाव शुध्दोदन होते.

एके दिवशी त्याची राणी मायादेवीला एक विचित्र स्वप्न पडूले. एक पांढरा हत्ती आपले सहा सुळे तिच्या पोटात खूपशीत होता...

दहा महिन्यांनंतर राणी तिच्या माहेरी लुंबिनीला जायला निघाली होती. वाटेत वृक्षांच्या एका सुंदर राईतून जात असताना ..

थांबा, काही काळ इथेच घालवावा असं मला वाटतंय.

राणी खाली उतरली आणि उद्यानाच्या मध्यभागी असलेल्या एका साल वृक्षाकडे निघाली...
अचानक -

माझ्या पोटात दुखतंय मला थांबलं पाहिजे,

तिथेच राणी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. ती होती वैशाख पौर्णिमेची रात्र जिकडे तिकडे शांतता नांदत होती.

हे वृत्त कळताच शुद्धोदन राजा त्वरेने लुंबिनीला गेला. बाळ बांळतिणीला त्याने राजधानीला आणले. असित मुनी बाळाला पाहाण्यासाठी राजवाड्यांत आले.



राजा राणीला आनंद झाला, पाचव्या दिवशी...



सिध्दार्थाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी...



एक वर्ष झाल्यानंतर-

पोटच्या पोरा सारखं वाढवलंसा तू याला, प्रजापती.

माझा लाडका बाळ! किती अभिमान वाटतो मला त्याची आई होण्याचा.

सिद्धार्थ मोठा होत होता आणि राजाला ते भविष्य चिंताग्रस्त करत होते.

एवढासा पोर... त्या जांभळाच्या झाडाखाली एका बसून राहतो, मला नाही हे बरं वाटत.

परंतु त्याला त्याच्या मित्रांचे खेळ फार क्रूर वाटतात .

एकदा सिध्दार्थ बागेत एकटाच फिरत होता....

बिचारा पक्षी! कुणी मारला असेल हा बाण?

सिद्धार्थने हलक्या हाताने पक्ष्याला लागलेला बाण बाहेर काढला आणि जखम बांधली. काही वेळाने-



सिद्धार्थचा चुलतभाऊ देवदत्त होता तो.





हे प्रकरण शेवटी न्यायालयात गेले.





वर्षामागून वर्षे गेली. एका शाक्य सामंताने - दंडपाणीने आपल्या कन्येचे यशोधरेचे स्वयंवर मांडले. त्या स्वयंवरास सर्व दूरदूरचे राजपुत्र आले.



यशोधरेने पती म्हणून राजपुत्र सिध्दार्थाला माळ घातली.



यशोधरेची निवड पाहुण्या राजांना आवडली नाही. ते दंडपाणीकडे गेले.



दंडपाणीने मुलीचे मन वळवण्याचा प्रयत्न केला.



शुध्दोदन राजाच्या कानांवर हे वृत्त गेले. त्याला वाईट वाटले.





ही परीक्षा पाहाण्यासाठी लोकांची अलोट गर्दी जमली.

अश्वारोहणात सिध्दार्थ पहिला आला.

तिरंदाजीत सुध्दा त्याची बरोबरी कोणी करू शकला नाही.

सिध्दार्थ व यशोधरा यांचे थाटाने लग्न झाले.

सिद्धार्थाने नेहमी राजविलासात जीवन घालवावे म्हणून राजा धडपडत असे.

लवकरच यशोधरेला पुत्र झाला. शुध्दोदन राजाला फार समाधान वाटले.



एक दिवस...



काही दिवसांनी सिध्दार्थ एका सुंदर रथात बसून राजधानीच्या रस्त्यांतून फिरायला निघाला. रथाला चार घोडे होते आणि छन्ना सारथी रथ हाकीत होता.



राजपुत्र शहरातून फिरत असताना त्याला कोणतीही दुःखद दृश्ये दिसता कामा नयेत अशी आज्ञा राजाने दिली होती पण वाटेत...

महाराज, तो म्हातारा माणूस आहे वार्धक्यामुळे वाकलाय

छन्ना हे कोण आहे रे? सबंध डोकं पांढरं झालेल आहे, फारच क्षीण दिसतो आहे, कातडी सुद्धा सुरकतलेली आहेत.

छन्ना, प्रत्येकजण म्हातारा होतो?

होय महाराज, म्हातारपण कुणालाही टळत नाही.

माझी यशोधरा पण म्हातारी होईल? वय झालं की माझी पण शक्ती खचेल?

कोणे एके दिवशी..

या माणसाला काय झालंय?

तो आजारी आहे महाराज, वेदनेमुळे तो कण्हतो आहे.

आजार? आजार म्हणजे काय?

आजार म्हणजे दुखणं. आयुष्यात कुणालाही दुखणं चुकत नाही महाराज...


मला पण?
हो ..... तुम्हाला पण!
नंतर एके दिवशी-
त्या माणसाला असे का नेत आहेत, छन्ना?
तो मेला आहे महाराज!
मेलेला एक हाच आहे? की दुसरेही लोक मरतात?
जन्माला आलेला प्रत्येक प्राणी केव्हा ना केव्हा मरतोच.
मला कसतरी वाटतंय छन्ना, आपण राजवाड्यात परत जाऊ या.
परत जाताना वाटेत..
थांब छन्ना, तो माणूस कोण? मी आत्तापर्यंत पाहिलेल्या सगळ्यांपेक्षा किती वेगळा नि शांत वाटतोय.
महाराज त्यांना साधू म्हणतात. सुखदु:खांचा त्याग करून ते आता सत्याच्या शोधात आहे.


राजवाड्यात-
सिध्दार्था, आम्हाला सांग तू असा दुःखी का?
आई, मला असं कळून चुकलंय की साऱ्या सजीव नि सुंदर वस्तू बदलत असतात. माणसं आजारी पडतात, म्हातारी होतात, मरतात. हे विचार मनात आले की मला कससंच वाटतं.


मध्यरात्री त्याने मनाशी निश्चय केला-
दुःखाचा शेवट करण्याचा मार्ग मला शोधला पाहिजे. मी त्या साधु सारखा सत्याचा शोध घेईल...


छन्ना माझा घोडा तयार करा, मला बाहेर जायचंय.
आणतो महाराज..


निघण्यापूर्वी सिध्दार्थ आपल्या पत्नीच्या खोलीत गेला. यशोधरा व राहुल बाळ गाढ झोपलेली होती.
बाळाचा पापाही घेत नाही नाहीतर यशोधरा उठेल. जावंच आता.

सिध्दार्थ घोड्यावर स्वार होऊन निघाला बरोबर फक्त छन्ना होता.



गावाबाहेर येताच सिध्दार्थ घोड्यावरून उतरला.



नंतर त्याने आपले लांब सुंदर केस कापले व तो एकटाच पुढे चालू लागला.



काही वेळाने त्याला एक भिकारी भेटला.



लवकरच तो राजगृहाला पोचला. राजगृह ही मगधदेशची राजधानी. दारोदार जाऊन तो निमूटपणे उभा राही; लोक भिक्षा घालीत ती घेई. बिंबिसार राजाने राजवाड्यातून त्याला पाहिले.



सेवकांनी सिध्दार्थाविषयी माहिती मिळवून आणली. राजा बिंबिसार त्याला भेटायला निघाला.





राजगृहाहून सिध्दार्थ निघाला आणि त्या काळच्या मोठ्मोठ्या ऋषी मुनींना भेटला. त्यांच्या शिकवणीने त्यांचे समाधान झाले नाही. आज जिथे गया शहर आहे त्या भागातल्या ऊरुबिल्व नावाच्या एका घनदाट अरण्यात तो शिरला.



उरुबिल्व नावाच्या त्या अरण्यात पाच संन्यासी होते.



सिद्धार्थ फक्त पाणी प्यायचा, फळे व वनस्पती खायचा. तो खडबडीत जमिनीवर झोपे. काही दिवसांनंतर त्याने रोज एकच धान्याचा दाणा खायला आरंभ केला. पण यामुळे त्याच्या अंगात शक्ती राहिली नाही. एकदा तो नदीवर आंघोळीला गेला असता..



झाडाची एक खाली आलेली फांदी पकडून तो उठला.



पण नदीवरून परत जायला निघतो तोच भोवळ येऊन तो खाली पडला.



हळू हळू तो उठला.



दुसऱ्या दिवशी तो एका वडाच्या झाडाखाली बसला असता सुजाता नावाची एका गुराख्याची मुलगी तिथे आली आणि तिने त्याला अन्न दिले.





नंतर..



पाचही संन्याशांची निराशा झाली.



सिद्धार्थ आता एकाकी राहू लागला.

मला सगळे सोडून गेले. जाऊ द्यात! पण उपासांनी शरीर खंगवून काही मिळत नाही एवढी खात्री झाली.

तो एका बोधिवृक्षाखाली जाऊन बसला.

ऊन – थंडी, तहान – भूक त्याला सतावत होती. पाऊस त्याला झोडीत होता.

काही झालं तरी मी ही जागा सोडणार नाही. दुःखाचा अंत करण्याचं ज्ञान होईल तेव्हाच इथून हलेन.

जीवनातल्या आनंदाची कितीतरी दृश्ये त्याच्या डोळ्यांपुढून गेली. पण ती त्याला मोहवू शकली नाहीत.

आणि मग त्याला प्रकाश दिसला.

सिध्दार्थाला ज्ञानप्राप्ती झाली. तो बुद्ध झाला.

मला ज्ञान मिळाले, सत्य कळाले. दुःखावर मात करण्याचा मार्ग मला मिळाला.

बोधिवृक्षाखाली परम सुखात त्याने सात आठवडे घालवले. मग इतरांना ज्ञान देण्यासाठी तो निघाला. उरुविल्वाच्या अरण्यात त्याच्याबरोबर जे पाच संन्यासी होते त्यांचा शोध घेत प्रथम तो बनारसला गेला तेथील हरिणबनात ते त्याला सापडले.



पण तो जवळ येता क्षणी सर्वजण उठले आणि त्यांनी त्याचा बहुमान केला.



बुध्दाचे बोलणे ऐकल्यावर मात्र ते त्याचे शिष्य बनले. अशा प्रकारे 'संघ' तयार झाला.

या जगात अतिशय दुःख आहे. त्याच्या मुळाशी आहे वासना, वासनामुक्त होऊ शकलात तर तुम्ही दुःखमुक्त व्हाल. मनातून दुःख घालवून देण्याचा मार्ग तुम्हांला दाखवतो.



मग बुध्दाने उरुबिल्वाला प्रयाण केले. तिथे काश्यप नावाच्या थोर ब्राह्मणाकड़े तो गेला.




सुस्वागतम्, आपण आत यावं.
काश्यप हा अग्नींचा उपासक होता. अग्नि म्हणजे आगीची देवता.


आपण पवित्र अग्नी ज्या खोलीत ठेवता तिथे मी झोपलो तर चालेल का ?


पवित्र अग्नीचं रात्री नाग रक्षण करीत असतो हे तुम्ही ऐकलंय ना? तुम्हांलां तो चावला तर ?
मला त्याची भीती नाही. कृपा करून मला अनुज्ञा द्या.


शेवटी काश्यपाने मान्यता दिली. बुध्द अग्नीजवळ शांतपणे बसून राहिला. काश्यप बाहेर निजायला गेला.


दुसऱ्या दिवशी पहाटे ..
मी आत जाऊन पाहतो बिचारा मेलाच असणार...

त्याने आत जाऊन पाहिले तर बुध्द शांतपणे बसलेला होता. अग्नीचे तेज त्याच्या मुखावर झळकत होते.

आपण माझे गुरु झालातं मला ज्ञान द्या.

बुध्दाने काश्यपाला व उरुबिल्वातल्या अनेकांना आपली शिकवण दिली.

एके दिवशी-

स्वामी मी असं ऐकतोय की बिबिसार राजा एक महायज्ञ करतो आहे.

आपण राजगृहाला जाऊ या.

राजगृहाला जात असताना वाटेत त्यांना एक मेंढरांचा कळप दिसला. त्यांतले एक लंगडे मेंढरू बुध्दाने उचलून घेतले.

बिच्चारं! किती यातना होत असतील याला..


भल्या माणसा तू कुठे चालला आहेस?
मी राजगृहाकडे निघालो आहे. ही सगळी मेंढरं महाराजांची आहेत आणि यांना सगळ्यांना पवित्र यज्ञाच्या अग्निमध्ये बळी देण्यासाठी नेत आहोत.


बुध्द राजगृहाकडे येत असल्याची बातमी राजा बिंबिसाराला कळली. तो आपल्या मंत्र्यांना घेऊन स्वतः त्यांच्या स्वागताला गेला.
सिध्दार्थ काश्यप मुनींच्या बरोबर येताना दिसतो आहे बहुतेक हा त्यांचा त्यांचा शिष्य बनलेला दिसतोय..


ते दोघे जवळ आले तेव्हा बुध्दाने हलक्या हातांनी मेंढरू खाली ठेवले.
राजा मला मार्ग सापडल्यावर भेटण्याची इच्छा तू व्यक्त केली होतीस ना? हा मी आलो आहे.
भगवन् मी लवकरच यज्ञ करतो आहे. महामुनी काश्यपांनी आणि आपण या समारंभाला यावं ही विनंती.

राजा, निरपराध प्राण्यांची हत्या हे सत्कृत्य नव्हे. सुखासाठी यज्ञ हा मार्ग नाही.

राजा महर्षि काश्यपांकडे वळला..

महर्षी, आपलं काय म्हणणं आहे यावर? आपण तर अग्निचे उपासक म्हणून प्रख्यात आहात.

काश्यपाने बुध्दापुढे मस्तक नमवले.

मी बुध्दाचा शिष्य आहे.

अस्सं ! म्हणजे इथे बुद्ध गुरू आहे आणि आपण शिष्य ? आपलाही यज्ञावर विश्वास नाही?

बुध्दाने मला योग्य मार्ग दाखवला. अग्नीची पूजा करून किंवा मुक्या प्राण्यांचा बळी देऊन आपण दुःखमुक्त होऊ शकत नाही हे मला त्यांच्या कडून कळाले आहे.

राजा बिंबिसार बुध्दाकडे वळला.

भगवन् आपल्या जवळचे ज्ञान मला शिकवा.

बुध्दाने राजाला शिकवण दिली.

हे भगवन् मी यज्ञाची कल्पना सोडली. मी बुध्दाला शरण आलो आहे.

दुसऱ्या दिवशी राजाने बुध्दाला व बुध्दाच्या शिष्यांना राजवाड्यात भोजनाचे निमंत्रण दिले. भोजन झाल्यावर-

स्वामी माझं वेणुवन उद्यान मी आपल्या संघाला दान देतो त्याचा स्वीकार करा.

एक दिवस कृशा गोतमी आपले मेलेले मूल घेऊन बुध्दाकडे आली.

भगवन् या बाळाला जिवंत करा. माझं हे एकुलतं एक मूल आहे.

दुःख आवर, मी सांगतो तसं कर. ज्या घरात कुणी कधी मेलेलं नाही अशा घरातून थोडं मोहरीचं बी आण मी तुझ्या बाळाला जिवंत करतो.

कृशा गोतमी दारोदार हिंडली.

माझे पती गत वर्षीच वारले!

माझी दोन मुलं दगावली.

माझी आई कालच देवाघरी गेली.

निराश होऊन कृशा गोतमी बुध्दाकडे परतली.

स्वामी, मृत्यू झालेला नाही असं एकही घर मला आढळलं नाही.

बेटा, जे जे जन्मलं त्याला मरण अटळ आहे. अखेरीस जगात दुःखाखेरीज दूसरं काही नाही. दुःखापासून मुक्त व्हायचं असेल तर वासनेपासून स्वतःला सोडवलं पाहिजे.

काही वर्षांनंतर.. शुद्धोदनाच्या दरबारात-

महाराज, आपल्या राजकुमारांचं जो तो नाव घेतो आहे. कितीतरी लोक त्यांचे शिष्य झाले. त्यांच्या शिकवणीचा ते प्रचार करत आहेत.

सिध्दार्थाला बोलावून आण म्हणावं, "मी म्हातारा झालो आहे मरणापूर्वी तुला भेटू इच्छितो."

बुध्द जेव्हा कपिलवस्तूला पोचला...

मुला, तुझं स्वागत असो! माझी इच्छा आहे की तू आता राजा व्हावंस.

नाही क्षमा करा पिताश्री, मी शांततेचा मार्ग पत्करला आहे.

राजाने बुध्दाची राहाण्याची सोय एका वृक्ष राईत केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी..

महाराज, राजकुमार दारोदार हिंडून भिक्षा मागत आहेत.

मला त्वरित तिकडे घेऊन चल.

बेटा, तू भिक्षा मागतोस?

आमची ही रीत आहे, महाराज.

काय बोलतोस हे? राजवंशातला तुझा जन्म!

महाराज़, तुम्ही राजवंशातले आहात. मी... मी बुध्द वंशातला आहे. माझ्या आधीचे सर्व बुध्द भिक्षा मागून त्यावर जगतात.

राजवाड्यात पोचताच तिथे जमलेल्या सर्वांना उद्देशून बुद्धाने मृदू स्वरात भाषण केले.

मनाला शांती देणारे शब्द!

हे थोर महात्म्याचे शब्द आहेत.

बुध्दाच्या लक्षात आले यांच्यांत यशोधरा दिसत नाही.

यशोधरा कुठे आहे ?

ती यायला तयार नाही.

तू गेल्यापासून ती दुःखात आहे. तिने तिचे सगळे केस कापले होते. ती साधे कपडे घालते; भुकेपुरतं खाते... तू करायचास अगदी तसं !

आपल्या दोन शिष्यांना बरोबर घेऊन बुध्द तिच्या खोलीकडे गेला.

हिच्या हृदयातल्या दुःखावर मला फुंकर घातली पाहिजे!

यशोधरने बुध्दाला पाहिले आणि ती त्याच्या पायांवर पडून ती रडू लागली.

मग तिच्या लक्षात आले इथे दुसरी मंडळी आहेत मग ती जरा अंतर राखून बसली.

बुद्धाने तिचे सांत्वन केले..


बुद्धाला कपिलवस्तूत येऊन आठवडा झाला होता.
राहुल त्या तिथे मध्यभागी एक माणूस बसलाय पाहिलंस? ते तुझे वडील आहेत. त्यांच्याकडे जाऊन त्यांना त्यांच्या स्वतःच्या प्राप्तीतला तुझ्या वाटणीचा हिस्सा माग.


राहुल बुद्धाकडे गेला.
बाबा! आईने मला तुमच्या स्वतःच्या प्राप्तीतला वाटा मागायला धाडलंय..


बुध्द आपल्या शिष्य सारीपुत्राकडे वळला...
सारीपुत्रा, माझा मुलगा माझ्या स्वतःच्या प्राप्तीतला हिस्सा मागतोय तर त्याला संघात येऊ दे.


राहुल संघाला मिळताच राजघराण्यातली दुसरी कित्येक मंडळी संघात सामील झाली. यात देवदत्तही होता. बुध्दा-बरोबर तोही फिरे. एक दिवस..
स्वामी, तुम्ही विश्रांती घ्यावी संघाचं नेतृत्व मी करतो.
नको देवदत्ता, संघाला अजून माझ्या मार्गदर्शनाची गरज आहे.

देवदत्ताला बुध्दाचा मत्सर वाटे. तो राजगृहात गेला. बिंबिसारचा मुलगा अजातशत्रू याची त्याने गाठ घेतली.



अजातशत्रूने देवदत्ताच्या सांगण्याप्रमाणे केले.



बुध्दाला ठार करण्यासाठी देवदत्ताने हरतऱ्हेने प्रयत्न केले.




गडगडत येण्याऱ्या दगडाचे दोन तुकडे झाले आणि बुध्दाच्या एकेका बाजूला एकेक तुकडा पडला.


देवदत्तांचे अनेक अनुयायी संघाला मिळाले.
दगड पडूनही तो मेला नाही.
दिसतो किरकोळ पण आहे "थोर", आपण त्याच्याकडेच जाऊयात.


मी ऐकतो की, माझे बरेच लोक संघाला मिळालेत... मग त्याच्या अंगावर हत्ती सोडला तर?


अजातशत्रूची आणखी एक आज्ञा..
नलगिरी हत्तीला मद्य पाजा, तो झिंगला की त्याला बुध्दाच्या वाटेत सोडा.


धावा धावा ! नलगिरी मोकाट सुटलाय ! अर्ध नगर त्याने उध्वस्त केलं... वीस माणसं ठार मारली.


स्वामी, आपण लपू यात माजलेला हत्ती इकडेच येतो आहे !
नाही, तो आपल्याला काही करणार नाही.

नलगिरी जोरजोरात पाय आपटीत पिसाटासारखा बुध्दाच्या अंगावर धावला.



बुध्दाने हसून हात वर केला. हत्तीने एकदम शांत होऊन बुद्धापुढे गुडघे टेकले.



अजातशत्रू दुःखी झाला. तो पुन्हा पुन्हा सारखा आजारी पडे. जीवक नावाचा त्याचा वैद्य होता.







अजातशत्रू जेव्हा त्या आंबराईत पोचला..




अजातशत्रूचे, मन कच खाऊ लागले.
बाराशे माणसं... आणि आवाज नाही, वस्तीचं चिन्हं नाही. बेत काय आहे तुझा? छापा घालून मारण्याचा तर नाही?
महाराज, माझ्यावर विश्वास ठेवा पुढे चला.


अजावशत्रूने पाहिले आणि तो थक्क झाला. शेकडो श्रोत्यांची ती सभा चित्रासारखी स्तब्ध होऊन ऐकत होती... बुध्दाची अमृतवाणी.
साऱ्या दुःख - क्लेश, भीती-द्वेष यांचं मूळ वासनेत आहे. ज्याच्या साऱ्या इच्छा, वासना मेल्या त्याला चिंतेचं कारण नाही. तो भिणार कुणाला?
किती समाधान देतात हे शब्द !
अजातशत्रूही बुध्दाचा शिष्य झाला.


त्यानंतर लवकरच देवदत्तालाही पश्चात्ताप झाला. एक दिवस तो आपल्या अनुयायांना म्हणाला..
वत्सांनो, मला बुध्दाकडे न्या तोच माझ्या त्रस्त मनाला शांती देईल.

देवदत्ताला नेणारे भोई मध्येच मेणा टाकून पाणी प्यायला गेले.

माझी माणसं गेली कुठे? मला बुध्दाला भेटण्याची घाई आहे ...

बुध्दापर्यंत पोचण्यापूर्वीच तो कोलमडून खाली पडला.

मी मरतो आहे, पण मला आता पटलं की बुध्द सर्वांचा त्राता आहे. बुध्दच माझं आश्रयस्थान आहे.

बुध्दं शरणं गच्छामि

धम्मं शरणं गच्छामि

संघं शरणं गच्छामि

बुध्द पुष्कळ वर्षे जगला, लाखों लोक त्याच्या अश्रयाला आले, लाखोंनी त्याचा उपदेश घेतला. विविध भाषा बोलणारे- दूर दूरच्या विविध देशांत राहणारे लक्षावधी लोक त्याचे अनुयायी बनले.

WHICH OF THE ACKs HAVE YOU STILL NOT READ?

EPICS AND MYTHOLOGY
Best known stories from the Epics and the Puranas

Abhimanyu
Agastya
Andhaka
Aniruddha
Aruni And Uttanka
Ashwini Kumars
Ayyappan
Bahubali
Bhanumati
Bheema And Hanuman
Bheeshma
Chandrahasa
Dasharatha
Dhruva And Ashtavakra
Draupadi
Drona
Elephanta
Gandhari
Ganesha
Ganesha And The Moon
Ganga
Garuda
Ghatotkacha
Hanuman
Hanuman To The Rescue
Harischandra
Heroes Of Hampi
Indra And Shachi
Indra And Shibi
Indra And Vritra
Jagannatha Of Puri
Jayadratha
Kacha And Devayani
Karna
Karttikeya
Konark
Krishna
Krishna And Jarasandha
Krishna And Narakasura
Krishna And Rukmini
Krishna And Shishupala
Krishna And The False Vaasudeva
Kubera
Kumbhakarna
Mahabharata
Mahiravana
Nachiketa
Nahusha
Nala Damayanti
Pareekshit
Parashurama
Prabhavati
Pradyumna
Prahlad
Purushottam Dev And Padmavati
Rama
Ravana Humbled
Saraswati
Sati And Shiva
Savitri
Shiva Parvati
Stories of Creation
Subhadra
Sudama
Sukanya
Surya
Tales From The Upanishads
Tales Of Arjuna
Tales Of Balarama
Tales Of Durga
Tales Of Indra
Tales Of Narada
Tales Of Shiva
Tales Of Vishnu
Tales Of Yudhishthira
Tapati
Thanjavur
The Churning Of The Ocean
The Gita
The Golden Mongoose
The King In A Parrot's Body
The Lord Of Lanka
The Pandava Princes
The Pandavas In Hiding
The Parijata Tree
The Sons Of Rama
The Syamantaka Gem
Tirupati
Tripura
Uloopi
Vaishno Devi
Vali
Vishwamitra
Yayati

VISIONARIES
Inspiring tales of thinkers, social reformers and nation builders

Adi Shankara
Albert Einstein
Anant Pai
Babasaheb Ambedkar
Basaveshwara
Buddha
Chaitanya Mahaprabhu
Chanakya
Chokha Mela
Dayananda
Deshbandhu Chittaranjan Das
Eknath
Fa Hien
Ghanshyamdas Birla
Guru Arjan
Guru Gobind Singh
Guru Har Gobind
Guru Nanak
Guru Tegh Bahadur
Hiuen Tsang
J.R.D Tata
Jagadis Chandra Bose
Jamsetji Tata
Jawaharlal Nehru
Jayaprakash Narayan
Jim Corbett
Jnaneshwar
Kabir
Kalidasa
Lal Bahadur Shastri
Lokmanya Tilak
M. S. Subbulakshmi
Madhvacharya
Mahavira
Marie And Pierre Curie
Megasthenes
Mirabai
Mother Teresa
Narayan Guru
Rabindranath Tagore
Ram Shastri
Ramana Maharshi
Ramanuja
Salim Ali
Shankar Dev
Soordas
Sri. Ramakrishna
Srinivasa Ramanujan
Subramania Bharati
Swami Chinmayananda
Swami Pranavananda
Tales Of Sai Baba
Tansen
Tulsidas
Vidyasagar
Vivekananda
Zarathushtra

INDIAN CLASSICS
Enchanting tales from Indian literature

Ananda Math
Ancestors Of Rama
Devi Choudhurani
Durgesh Nandini
Kadambari
Kannagi
Kapala Kundala
Kumanan
Maarthaanda Varma
Malavika
Manonmani
Prince Jivaka
Raj Singh
Ratnavali
Shakuntala
The Adventures Of Pratapan
The Elusive Kaka
Udayana
Urvashi
Vasantasena
Vasavadatta
Veer Dhaval

FABLES AND HUMOUR
Evergreen folktales, legends and tales of wisdom and humour

A Bag Of Gold Coins
Amrapali
Andher Nagari
Angulimala
Bikal The Terrible

BIRBAL STORIES
Birbal The Clever
Birbal The Genius
Birbal The Just
Birbal The Wise
Birbal The Witty
Birbal To The Rescue
The Inimitable Birbal

Chandralalat
Dhola And Maru
Friends And Foes
Gopal And The Cowherd
Gopal The Jester

HITOPADESHA TALES
Choice Of Friends
How Friends Are Parted
Hothal

JATAKA TALES
Battle Of Wits
Bird Stories
Deer Stories
Elephant Stories
Jackal Stories
Monkey Stories
Nandi Vishala
Stories Of Courage
Stories Of Wisdom
Tales Of Misers
The Deadly Feast
The Giant And The Dwarf
The Hidden Treasure
The Magic Chant
The Mouse Merchant
True Friends
Kanwal And Kehar
Kesari The Flying Thief
King Kusha
Manduka

PANCHATANTRA TALES
Crows And Owls
How The Jackal Ate The Elephant
The Brahmin And The Goat
The Dullard
The Greedy Mother-in-law
The Jackal And The Wardrum

Raman Of Tenali
Raman The Matchless Wit
Sahasramalla
Sakshi Gopal
Satwant Kaur
Sharan Kaur
Shrenik
Sukhu And Dukhu
Sundari
Tales Of Maryada Rama
The Acrobat
The Adventures Of Agad Datta
The Adventures Of Baddu And Chhotu
The Bridegroom's Ring
The Celestial Necklace
The Clever Dancer
The Cowherd Of Alawi
The Fearless Boy
The Fool's Disciples
The Golden Sand
The Green Demon
The Unhappy Tiger
The Learned Pandit
The Lost Prince
The Magic Grove
The Miraculous Conch
The Mystery Of The Missing Gift
The Pandit And The Milkmaid
The Pig And The Dog
The Pious Cat
The Priceless Gem
The Prince And The Magician
The Prophecy
The Queen's Necklace
The Rainbow Prince
The Secret Of The Talking Bird
The Silent Teacher
The Tiger And The Woodpecker
The Tiger Eater
Thugsen
Vidyut Chora
Vikramaditya's Throne

BRAVEHEARTS
Stirring tales of brave men and women of India

A Nation Awakes
Ahilyabai Holkar
Ajatashatru
Akbar
Amar Singh Rathor
Ashoka
Babur
Bagha Jatin
Bajirao I
Baladitya And Yashodharma
Balban
Banda Bahadur
Bappa Rawal
Beni Madho And Pir Ali
Bhagat Singh
Bidhi Chand
Bimbisara
Chand Bibi
Chandra Shekhar Azad
Chandragupta Maurya
Chennamma Of Keladi
Dara Shukho And Aurangazeb
Durgadas
Ellora Caves
Hakka And Bukka
Hari Singh Nalwa
Harsha
Hemu
Humayun
Jahangir
Jallianwala Bagh
Kalpana Chawla
Kochunni
Krishnadeva Raya
Kunwar Singh
Lachit Barphukan
Lalitaditya
Mangal Pande
Noor Jahan
Padmini
Panna And Hadi Rani
Paurava And Alexander
Prithviraj Chauhan
Raja Bhoja
Raja Raja Chola
Rana Kumbha
Rana Pratap
Rana Sanga
Rani Abbakka
Rani Durgavati
Rani Of Jhansi
Ranjit Singh
Rash Bihari Bose
Roopmati
Sambhaji
Samudra Gupta
Sea Route To India
Shah Jahan
Shalivahana
Shantala
Sher Shah
Shivaji
Subhas Chandra Bose
Sultana Razia
Surjya Sen
Tachcholi Othenan
Tales Of Shivaji
Tanaji
Tenzing Norgay
The Historic City Of Delhi
The Rani Of Kittur
Tipu Sultan
Veer Hammir
Veer Savarkar
Velu Thampi
Vikramaditya

CONTEMPORARY CLASSICS
(New Category)
The best of modern Indian literature

The Blue Umbrella

Titles available in English and other Regional languages on www.amarchitrakatha.com

युगनिर्माता

भगवान बुध्द

धर्माच्या नावाखाली केवळ जुलूम जबरदस्तीचे साधन झालेल्या जाती व्यवस्थेचा स्वीकार करण्यास बुध्दाने नकार दिला. सत्ताधुंद पुरोहित हे ईश्वरप्राप्तीच्या मार्गातील एकमेव साधन असल्याचे मानावयास तो तयार नव्हता. त्याने देवांच्या अधिकारालाच आव्हान दिले. प्रामाणिक तळमळीविना केलेले तपाचरण, ध्यानधारणा हे केवळ उपचार असून ते निरर्थक असल्याची त्याची खात्री पटली होती.

यामुळे अंतिम सत्याच्या शोधार्थ तो एकटाच निघाला. अशा शोधात एका बोधी वृक्षाखाली तो ध्यानस्थ बसला असताना त्याला दिव्य ज्ञानाचा साक्षात्कार होऊन निर्वाणावस्था प्राप्त झाली. त्याला जे ज्ञान प्राप्त झाले व अनुभूती मिळाली त्याची शिकवण त्याने इतरांना दिली.

आज सर्व जगात त्याचे अनुयायी आहेत. विशेषत: अति पूर्वेकडील देशांत ते फार मोठ्या संख्येने आहेत.









Buy online at www.amarchitrakatha.com

ISBN 978-93-5085-161-6